# प्रेसनोट

जा.क्र. ४२ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक :— २०/०१/२०१८

## ''खुनाचे प्रेयत्नाच्या गुन्हयात ३ आरोपींना दहा वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे भंडारा अंतर्गत निर्वाण गल्ली भंडारा शहर येथिल तक्रारदार श्री. प्रशांत रत्नाकरराव मस्के, वय ४० वर्ष यांचे मालकीचे कम्प्युटर ईस्टीटयुट असुन दिनांक १/२/२०१३ रोजी आपले दुकानात बसले असतांना दुपारी ४.०० वा. दरम्यान यातील आरोपी अनिल भुरे व किरण नंदुरकर हे दारू पिवुन आले व आम्हाला आताच आपले कम्प्युटर ईस्टीटयुट मध्ये अॅडमिशन दया याकारणावरून वाद करून झगडा भांडण केला, तक्रारदार व त्यांचा मित्र संजय निर्वाण यांना मारपीट करून निघुन गेले. पुन्हा सायंकाळी ६.०० वा. दरम्यान तक्रारदार हे मित्र संजय निर्वाणसह आपले घरी हजर असता आरोपी **अनिल भुरे, किरण नंदुरकर, विक्रांत मोगरे व त्याचे सोबत ईतर दोन ईसम** असे मिळुन मोटार सायकलने आले. घरात जावुन **विक्रांत मोगरे अनिल भुरे** यांनी तलवारीने तक्रारदार व त्यांचा मित्र संजय निर्वाण यांना जिवानीशी ठार करण्याचे उद्देशाने तलवारीने वार करून जख्मी केले, घडलेल्या घटणेसंबंधी फिर्यादीने पोलीस ठाणे भंडारा येथे तोंडी तक्रार दिल्यावरून अपराध क्र. ५९/१३ कलम ३२६,१४३,१४७,१४८,१४९,४४८,४२७ भादवि सह कलम ४/२५ भारतीय हत्यार कायदा अन्वये सर्व आरोपी विरूध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक ए. एच. जारवाल, पो.स्टे. भंडारा यांनी केला. गुन्हयातील आरोपींना अटक करून साक्षपुरावे गोळा केले आणि तपासात कलम ३०७ भादवि वाढ करून आरोपीतांन विरूध्द सत्र न्यायालय, भंडारा येथे आरोप पत्र दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ३३/१३ अन्यवे न्यायाधिश सा. यांचे समक्ष सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी **मा. अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. सचिन बी. भंसाली सा.** यांचे समक्ष चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री रमाकांत नं. खत्री, सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक २०.०१.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गांर्भीय लक्षात घेवुन **आरोपी क्र. १ अनिल देवराम भुरे, वय २८ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा, क्र. २ विक्रांत उर्फ विक्की सिध्दार्थ मोगरे, वय २८ वर्ष रा. आंबेडकर वार्ड भंडारा, क्र. ३ किरण नामदेवराव नंदुरकर, वय २७ वर्ष रा. तिलक वार्ड भंडारा** यांचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने **कलम ३०७ भादवि अन्वये प्रत्येकी दहा वर्ष, सश्रम कारावास व ५,०००/— रूपये दंड**, कलम ४५२ भादवि मध्ये प्रत्येकी ५ वर्ष, सश्रम कारावास व २०००/— रूपये दंड व कलम ४२७ भादवि मध्ये प्रत्येकी २ वर्ष सश्रम कारावास व २०००/— रूपये दंड अशी शिक्षा सुनावण्यात आली. सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक मनोज सिडाम यांचे मार्गदर्शनात पो.हवा. हर्षवर्धन मेश्राम, ब.नं. ६२४ यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

( सपोनी.के.एम.हत्तीमारे)
जिवीशा शाखा भंडारा
दुरध्वनी.क्र८६६८६९५६३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.